**तातडीचे/ महत्वाचे**

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती.

क्रमांक:संगाबाअवि/८/सी- 243 /२०२४
दिनांक :07.०२.२०२४

प्रति,

प्राचार्य,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी
संलग्नीत सर्व संबंधित महाविद्यालये.

**विषय :- २०२४-२५ या शैक्षणिक सत्राचे विद्याविषयक लेखा परीक्षणाच्या माध्यमातून संलग्नीकरण करण्याबाबत निदेश क्र.४३/२०२३, In Appendix-I च्या मानकेच्या परिच्छेद-७ च्या अनुषंगाने Pool of Experts मधून दोन Internal Member ची नांवे पाठविण्याबाबत..**

संदर्भ :- विद्यापीठ निदेश क्र.४३/२०२३, दि.६.१०.२०२३

महोदय/महोदया,

आपणांस विदितच आहे की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा २०१६ मधील कलम ३७(१)(ट) प्रमाणे विद्याविषयक लेखा परीक्षणाच्या माध्यमातून महाविद्यालयाचे संलग्निकरण करण्याबाबतची तरतूद आहे. सदर तरतुदीस अनुसरुन अधिष्ठाता मंडळाने विद्याविषयक लेखापरिक्षण मानके व कार्यप्रणाली तयार केली असून, विद्यापीठाच्या प्राधिकारीणीने त्याला मान्यता प्रदान केली आहे व त्याअनुषंगाने निदेश क्र.४३/२०२३, दि. ६.१०.२०२३ निर्गमित करण्यात आला आहे.

ज्या महाविद्यालयाचे विषय/अभ्यासक्रम/विद्याशाखेचे संलग्निकरण २०२३-२४ मध्ये संपलेले आहे. अशा महाविद्यालयांनी सत्र २०२४-२५ पासून विद्याविषयक लेखा परीक्षणाच्या माध्यमातून महाविद्यालयाचे संलग्निकरण करावयाचे आहे. त्यासंदर्भात Pool of Experts ची यादी विद्यापीठाच्या संकेत स्थळावर News & Announcements मध्ये प्रसिध्द करण्यात आलेली आहे. निदेशाच्या परिच्छेद-७ अंतर्गत सदर Pool of Experts मधून आपल्या महाविद्यालयात सद्यस्थितीत कार्यरत असलेले दोन Internal Members ची नांवे drcollegiate@sgbau.ac.in या ई-मेल वर विद्यापीठाला पाठवावयाचे आहे. करीता **आपणांस विनंती करण्यात येते की, सदर नांवे दि.२०.२.२०२४ पर्यंत पाठवावे अन्यथा आपल्या महाविद्यालयाचे सत्र २०२४-२५ चे संलग्नीकरणाची कार्यवाही करता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.**

आदेशान्वये.

आपला विश्वासू,

**कुलसचिव**
संत गाडगे बाबा
अमरावती विद्यापीठ.

**टिप** :

* कृपया नांवे पाठविण्यापुर्वी विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आपल्या महाविद्यालयांसदर्भातील Pool of Experts च्या यादीची शहानिशा करुन नांवे पाठविण्यात यावी.
* ज्या महाविद्यालयांनी सत्र २०२३-२४ च्या संलग्नीकरणाकरीता दोन Internal Members ची नांवे पाठविलेली नाही अशा महाविद्यालयांनी सुध्दा Pool of Experts मधून आपल्या महाविद्यालयात सद्यस्थितीत कार्यरत असलेले दोन Internal Members ची नांवे पाठविण्यात यावी.

f/Academic Audit Schedule